# ॥ अन्य धर्मातील संतकवींचे मराठी साहित्यातील योगदान ॥

**डॉ. सचिन सि. रुपनर**
अण्णासाहेब आवटे कॉलेज,मंचर.
**संपर्क क्र. ९४२०९७७८२२**
E-Mail : sachinrupnar@gmail.com

महाराष्ट्र ही संतांची आणि वीरांची भूमी मानली जाते. वीरपुरुषांच्या पराक्रमाचे पोवाडे महाराष्ट्राने जसे येथे गायिले तसेच सौंदर्याची लावणीही म्हटली गेली. भाषेच्या पांडित्याचे पंडितांनी दर्शनही घडविले. तसेच संतांच्या वैराग्याच्या वीराण्याही या महाराष्ट्राने ऐकल्या. संतांनी या महाराष्ट्राला आपल्या साहित्यिक रचनेतून भक्तीचा, नामाचा सोपा मार्गही सांगितला. कीर्तन परंपरेतून, भारूडातील रूपकातून सामाजातील अनिष्ट रूढी-परंपरांचे दोषदर्शन घडवून त्यावर, दांभिकतेवर कडाडून हल्ला चढविला व समाजजागृतीचे कार्य केले. संसार करत करत परमार्थही साधता येतो, हे सर्वसामान्यांना पटवून देण्यासाठी अभंगांची निर्मिती केली. असे विविध स्वरूपाचे साहित्य रचून संतांनी मध्ययुगीन कालखंडात ईश्वरभक्तीचा मार्ग दाखवून परमार्थ शिकविला. त्यांच्या या साहित्यिक लेखनामध्ये विषयाची, आशयाची व रचनेची विविधता दिसून येते. हे साहित्य जसे विविधस्वरूपिणी आहे तसेच या कालखंडात विविध संतांनी लेखन केलेले दिसून येते. या रचना जशा हिंदू धर्मातील संतांनी केल्या आहेत तसेच त्यांच्याच बरोबरीने अहिंदू किंवा हिंदू धर्मातील संतांशिवाय इतर धर्मातील संतांनीही मराठी भाषेतून वाङ्मय लेखन करून मराठी भाषेच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांनी मराठी भाषेच्या वैभवात मोलाची भर घातली आहे. त्यामुळे अशा अहिंदू असणाऱ्या किंवा अन्य धर्मातील संतांच्या वाङ्मयीन कार्याचा शोध घेणे गरजेचे ठरते. म्हणून सदर शोधनिबंधात अन्य धर्मातील संतकवींचे मराठी साहित्यातील योगदान यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न असणार आहे.

## ०१. जैन संप्रदाय :

भारतातील इतर प्राचीन धर्मापैकीच जैन धर्म प्राचीन असून तो जगातील एक प्रमुख धर्म आहे. प्रस्तुत धर्माच्या पुनरुज्जीवनाचे कार्य सर्वप्रथम श्री. ऋषभदेव यांनी केले. एकूणच लोकसंख्येच्या दृष्टीने भारतातील ६ व्या क्रमांकावर असणारा हा धर्म आहे. हा धर्म श्रमण परंपरेचे पालन करतो. लोकशाही विचारमूल्यांचा स्वीकार या धर्माने केलेला दिसून येतो. ‘समता, स्वातंत्र्य व न्याय’ या त्रिसूत्रीचा स्वीकार आहे. ‘अनेकांतवाद’ हा या धर्मातील महत्त्वाचा विचार असून तो मानवी कल्याणाचा पुरस्कार करतो. मानवतेच्या कल्याणासाठी सतत जागृत राहून कार्य करण्याचे अभिवचन हा धर्म देतो. या धर्माला काही प्रमाणात राजाश्रय देखील मिळालेला आहे. इ.स.पूर्व सहाव्या शतकामध्ये जगामध्ये अनेक धर्मसंप्रदाय उदयास आले त्यापैकी जैन संप्रदाय हा एक आहे. जैन साहित्यातील नोंदीनुसार या काळात ६२ धर्मसंप्रदाय उदयाला आले होते त्यापैकीच जैन धर्म हा एक होय. सदर संप्रदायामध्ये एकूण चोवीस तीर्थंकरांची परंपरा सांगितली जाते. त्यापैकी वृषभनाथ पहिले व पार्श्वनाथ हे २३ वे तीर्थंकर आहेत. अशा या संप्रदायाचे तत्त्वज्ञान थोडक्यात पाहणे इथे क्रमप्राप्त ठरते. ते पुढीलप्रमाणे -

### जैन धर्मियांचे तत्वज्ञान :

- 'अहिंसा परमो धर्मः' हा मुख्य नियम या धर्मात मानला जातो.
- **जीव -** जैन धर्मानुसार जीव हा चैतन्यमय आहे. जीव अविनाशी आहे. जीव हा देव, मनुष्य, पशू, पक्षी, इ. विविध रूपात जन्म घेतो.
- **अजीव -** अजीव हे चैतन्यविरहित आहेत. अजीवाचे धर्म, अधर्म, आकाश, पुदगल, काल, हे पाच प्रकार व जीव मिळून सहा द्रव्ये तयार होतात. जैनांच्या मते कोणत्याही द्रव्याची तीन अंगे असतात.

- **पाप- पुण्य -** पुण्य म्हणजे, जीवाशी संबंध असलेला व जीवाला स्वर्ग, ऐश्वर्य, इ.चांगले फळ प्राप्त करून देणारा कर्म- समुदाय होय. पाप म्हणजे पुण्याच्या विपरीत असा कर्मसमुदाय होय.
- **ज्ञान -** जैन तत्त्वानुसार ज्ञान परोक्ष व अपरोक्ष असे दोन प्रकारचे असते. अपरोक्ष ज्ञान आत्मा कर्मबंधनातून मुक्त झाल्यावर प्राप्त होते तर परोक्ष ज्ञान म्हणजे मन किंवा इंद्रियाद्वारा वस्तूंचे मिळणारे ज्ञान.
- **स्यादवाद -** हा सिद्धान्त सप्तभंगी सिद्धान्त म्हणून ओळखला जातो.
- एखाद्या वस्तूसंबंधी किंवा विषयासंबंधी विचार करतांना ७ वेगवेगळ्या प्रकारे तो विचार मांडता येतो.

**पंचमहाव्रते**

- सत्य - सत्य म्हणजे नेहमी खरे बोलावे.
- अहिंसा - अहिंसा म्हणजे कोणत्याही जीवाची मन, वचन अथवा कायेद्वारे हत्या करू नये.
- अस्तेयं - अस्तेय म्हणजे चोरी करू नये.
- अपरिग्रह - अपरिग्रह म्हणजे द्रव्यसंग्रह करू नये, स्वार्थी वृत्तीचा त्याग करावा.
- ब्रह्मचर्य - मनामध्ये कामवासना बाळगू नये.

**तीन गुणव्रते**

- दिग्व्रत -
- कालाव्रत -
- अनर्थदंडव्रत

**चार शिक्षाव्रते**

- सामायिक
- प्रोषधोपवास

- भोगोपभोग परिणाम
- अतिथी संविभाग

## जैन संप्रदायचे साहित्य :

जैन धर्मियांनी संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश तसेच तमिळ, कन्नड इत्यादी प्राचीन व देशी भाषांतून साहित्यनिर्मिती करून प्रत्येक क्षेत्रात मोलाची भर घातलेली आहे. त्यांनी वाङ्मयाच्या सर्वच क्षेत्रात म्हणजे काव्य, कथा, व्याकरण, छंद, कोश इत्यादी क्षेत्रात लेखन केलेले आहे. त्याचबरोबर त्यांनी पुराणे, तत्त्वज्ञान, कर्मसिद्धांत इत्यादी विषयावरही ग्रंथनिर्मिती केली आहे. अशा या संप्रदायातील संतांनी मराठी भाषेतही साहित्यरचना केली आहे. त्यातील काही संतांची रचना पुढीलप्रमाणे -

**०१. पंडित मेघराज :** पंडित मेघराज हा १६ शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेलेला जैन धर्मीय कवी होय. तो ब्रह्मजिनदासाचा शिष्य असून त्याने त्याच्या काव्यरचनेत स्वतःचा उल्लेख 'मेघा' असा केलेला आहे. **'जसोधररास'** हा त्याचा ग्रंथ ११६४ ओव्यांचा असून त्यातून त्याने यशोधराचे चरित्र वर्णन केलेले आहे. जैन तत्वज्ञान आणि अचारधर्माचे विवेचन या ग्रंथात आलेले आहे. त्याचबरोबर अहिंसा आणि ब्रह्मचर्य या व्रताचे महत्त्व त्याने या ग्रंथातून स्पष्ट केले आहे. त्याचे मराठी व गुजराथी अशा दोन्ही भाषांवर प्रभुत्व असल्याने त्यांनी या दोन्ही भाषांतून ग्रंथरचना केलेली आहे. याशिवाय त्यांची **'पार्श्वनाथ-भवांतर,' 'रामायणी-कथा,' 'गोमटस्वामीगीत,' 'गुजरी-मराठी गीत'** अशी इतरही काही रचना उपलब्ध आहे.

**०२. कामराज :** ब्रह्मजिनदासाचा दुसरा शिष्य म्हणजे कामराज होय. तोही १६ शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेला. हा मूळचा गुजराथी होता. **'सुदर्शनचरित्र'** आणि **'चैतन्यफाग'** ही त्याची दोन महत्त्वपूर्ण काव्ये. सुदर्शनचरित्रात कामदेव सुदर्शन

याने ब्रह्मचर्याचेव्रत पालन अखेपर्यंत कसे केले  याची कथा आली असून त्याचे दुसरे काव्य रूपकात्मक स्वरूपाचे आहे.

**०३. पंडित सुरिजन :** पंडित मेघराज आणि कामराज यानंतर जैन धर्मिय संप्रदायातील मराठी भाषेतून रचना करणारा कवी म्हणून पंडित सुरिजन यांचा नामोल्लेख करता येतो. त्याने '**परमहंसकथा**' हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ त्याने इ.स.१६५९ नंतर लिहिला असावा असे सुभाषचंद्र अक्कोळे यांचे मत आहे. या ग्रंथातून जैन तत्वज्ञानाचे प्रतिपादन केलेले आहे. हा एक आध्यात्मिक ग्रंथ आहे. अशा प्रकारे जैन धार्मिय कवींनी मराठी भाषेतून साहित्य रचना केलेली आहे.

## सूफी संप्रदाय :

इस्लाम धर्मपरंपरेनुसार सूफी पंथाची सुरुवात ह.मो.पैगंबर यांच्यापासून झाली असून त्यांनाच परमेश्वराचा साक्षात्कार झाला. मुस्लिम धर्माच्या सुरुवातीच्या काळात सूफी संतांनी निवृत्ती मार्गाचाच अवलंब केलेला दिसून येतो. संसारातील सर्व ऐहिक सुखांचा त्याग करून एकांतवासात राहून कठोर तपश्चर्या करण्यावर सुखी संतांनी भर दिलेला आहे. योगमार्गाप्रमाणे देहदंडाद्वारे परमेश्वराचा कृपाशीर्वाद मिळवू पाहणारे ते तपस्वी होते. हा पंथ इस्लाम धर्मपरंपरेचा, इस्लाम धर्माच्या चौकटीत असणारा संप्रदाय आहे. "परमेश्वराचे चिंतन करणे ही सूफीची प्रारंभीच्या काळातील तत्त्वे होती. परमेश्वराची वक्रदृष्टी, भीती त्यांच्या मनात सदासर्वकाळ जागृत असे"[१] असे मत इब्ने खालेदूनने व्यक्त केलेले आहे. म्हणजेच सूफीनी वैराग्य व साधनामार्ग यांना प्राधान्य दिले असून त्यातूनच इस्लाम धर्मात संसार त्यागाची भावना तीव्र झाली असे म्हणता येते. कारण चिंतन व मनन या मार्गाने आपणाला परमेश्वराची कृपादृष्टी प्राप्त करून घेता येऊ शकते अशी भावना प्रबळ होती. त्यातून हा संप्रदाय उदयाला आलेला दिसून येतो.

इस्लाम धर्मातील जे गूढवादी लोक आहेत त्यांच्याकरिता 'सूफी' हा शब्द वापरला जातो. सूफी हा शब्द 'सूफ' या शब्दाच्या रूपापासून निर्माण झालेला आहे. सूप उनी कापड घालणारा किंवा गोधडी वापरणारा, कालांतराने ऊनी व गोधडी वापरणे सर्वसामान्य झाले. असे कपडे वापरणे ते प्रेषित मोहम्मद पैगंबर याचे अनुकरण समजत. तर काही अभ्यासक सूफी याशब्दाचा उगम 'अहले सुफ्फा' असाही म्हणतात. काहींच्या म्हणण्यानुसार दोस्त, मित्र या अर्थावरून 'असहाबा' म्हणजे ओट्यावर बसणारे असाही अर्थ आहे. या मतप्रवाहावरून असे म्हणता येते की, सूफी शब्दाची उत्पत्ती 'सफ' शब्दावरुन झाली आहे. 'सूफीया' या फार्सी शब्दापासून अध्यात्मातील ज्ञानी व्यक्ती या अर्थावरून 'सूफी' हा शब्द आला असेही एक मत आहे. यावरून आपणाला असे नमूद करता येते किओ 'सूफी' या शब्दाच्या उत्पतीबद्दल विद्वानांमध्ये एकमत नाही.

## सूफी संप्रदायचे तत्त्वज्ञान :

सूफी संप्रदायाचे तत्त्वज्ञान सर्वस्पर्शी आहे. या संप्रदायावर अनेकांनी लेखन केलेले आहे. सूफी संप्रदाय ज्ञानप्राप्तीचे प्रमुख चार मार्ग मानतो. तरिकत, हकीकत, शरित आणि मारिफत हे ते चार मार्ग आहेत. तर सूफी पंथामध्ये ज्ञानाचे दोन प्रकार आहेत. त्यातला एक ब्राह्यत्कारीज्ञान तर दुसरा म्हणजे आंतरिकज्ञान होय. कर्मठ धर्माचरणाविरुद्ध प्रतिक्रिया म्हणून सूफी तत्वज्ञान विकसित झालेले दिसते. तसेच या पंथात इतर संप्रदायाप्रमाणे गुरूला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण गुरुकृपेशिवाय शिष्याला अध्यात्मज्ञान प्राप्त करून घेता येत नाही असे या पंथाचे मत आहे.

त्यांच्या तत्वज्ञानानुसार अल्ला हा सर्वस्पर्शी असून तो सर्वत्र व्यापलेला आहे. विश्वातील सर्व वस्तूमात्रांमध्ये, प्राणिमात्रांमध्ये तो सामावलेला आहे. सूफी संत समाधी, नामस्मरण, ध्यान धारणा यांना महत्त्व देणारे आहेत. कारण त्यांच्या

तत्वज्ञानानुसार त्यातूनच त्यांना फनापर्यंत जाणे सहज शक्य आहे. त्यांनी परमात्म्यात विलीन होण्यास महत्त्व दिले आहे. या पंथात स्वर्गप्राप्तीला महत्त्व दिले नाही तर परमात्म्याची कृपा संपादन करून परमात्म्यात विलिन होणे हे यांचे ध्येय असते. परमेश्वर व मानव यांच्या भेटीतील अडथळा म्हणजे हे सांसारिक जग होय. त्यामुळेच सूफी संत विलासी जीवनापासून दूर होताना दिसतात.

सूफी पंथीय एकेश्वरवादाचा स्वीकार करणारा पंथ आहे. म्हणजेच या सृष्टीवर घडणाऱ्या सर्व घटनांचा सर्व घटना घडविणारा कर्तासवरता तो ईश्वर एकच असून त्याची भीती मनात ठेवली पाहिजे व त्याच्यावर विश्वास ठेवला पाहिजे असे या पंथाचे मत आहे. हाच ईश्वर सर्वशक्तिमान असून तो सर्वगुणसंपन्न आहे. ईश्वराच्या इच्छेशिवाय या सृष्टीतील एक कणसुद्धा हलू शकत नाही; एवढे या सृष्टीवर त्याचे नियंत्रण आहे. या ईश्वराचे वर्णन डोंबाऱ्याच्या बाहुलीच्या खेळाच्या रूपकातून केले जाते. “डोंबाऱ्याच्या बाहुलीची दोरी ज्याच्या हातात असते तो आपल्या इच्छेनुसार त्या बाहुल्यांना खेळवतो. त्याप्रमाणे सृष्टीची दोरी ज्याच्या हातात आहे तो एकमेव ईश्वर सर्वज्ञानी, तत्त्वदर्शी, कीर्तिमान, शक्तिमान आणि निश्चितच सर्व कर्मांचा स्वामी आहे. सृष्टीतील सर्व चल-अचल वस्तूंचे त्यास ज्ञान आहे. विश्वातील सर्व त्याच्यासमोर नतमस्तक आहेत”[२] असे या धर्माचे तत्वज्ञान कौसन यजदानी यांनी सांगितले आहे.

तर “ईश्वरच प्रथम व शेवट आहे. तो सृष्टीचा व्यवस्थापक आहे. तो जिवंत आहे. तोच विधाता, तोच शासक आहे. त्याचा आकार नाही, त्याचे काही तत्त्व नाही,... ... तो सर्वव्यापी, सर्वज्ञाता आहे. तो स्थळकाळाच्या सीमेपलीकडे आहे”[३]असे सूफी संत इमाम गझली यांनी आपले ईश्वरबद्दलचे विचार मांडले आहेत. त्यावरून परमेश्वराच्या सर्वव्यापीत्वाचा परिचय होतो. त्याचे अस्तित्व समजण्यास मदत होते. अशा स्वरूपाचे सूफी पंथाचे तत्वज्ञान आहे आणि या तत्वज्ञानावर हा पंथ आचरण करणारा आहे. त्यावरच त्यांचा आचारधर्म आधारलेला आहे.

## सूफींची आचारसंहिता :

सूफींची ईश्वरविषयक अशी संकल्पना आहे की, 'ईश्वराला आपल्यात भागीदार आणि उत्तराधिकारी मान्य नाही' ही संकल्पना वेदांताच्या ब्रम्हासमान असून त्यांचा धर्म या संकल्पनेला धरून आहे. त्यामुळे सूफीयांच्या मतानुसार सूफी पंथ म्हणजे एक मार्ग होय, आचार नव्हे. त्यामुळे ज्ञानप्राप्तीसाठी पूर्ण आचरणाला ते निरतिशय महत्त्व देतात. त्यामुळे या पंथियांचा शरियत आचारसंहितेवर खास करून विशेष भर आहे. ती पुढीलप्रमाणे -

०१. कुराण या पवित्र ग्रंथाचे पठण करावे आणि साधकाने नेहमी मिताहार करावा.
०२. संत सेवा करावी व मक्केची यात्रा करावी.
०३. सुखी साधकाने आईवडिलांची व लोकांची सेवा करावी
०४. गुरुची सेवा करावी.
०५. कब्रस्थानात विनोद,खानपान न करता सतत परमेश्वराचे नामस्मरण करावे.

या आचारधरर्माबरोबरच "सूफी संप्रदायामध्ये साधकाची दीक्षा कोणाला द्यावी याचे बंधन नाही. मनापासून ईच्छा असणाऱ्या साधकाला दीक्षा देता येते. राजापासून दरोडेखोरापर्यंत सर्वांना सूफी दीक्षा देतात"[४]असे डॉ.एजाज शेख यांनी या संप्रदायाच्या आचारधर्माचे स्पष्टीकरण देताना म्हटले आहे.

## सूफी संप्रदायाची मराठी साहित्यसंपदा :

मुसलमान संतांचे मराठी साहित्य हे मध्ययुगीन मराठी साहित्याला लाभलेले एक अनोखे लेणे आहे. त्यांच्या साहित्यनिर्मितीने मराठी साहित्यात अत्यंत मोलाची भर टाकली आहे. म्हणूनच प्रस्तुत ठिकाणी या सूफी संप्रदायातील संतांनी मराठीत केलेल्या साहित्यनिर्मितीचा थोडक्यात आढावा घ्यायचा आहे.

**०१.संत हुसेन अंबरखान :** ‘भागवद्‌गीतेचा पहिला मुस्लीम भाष्यकार’ म्हणून त्याचा उल्लेख केला जातो, तो संत म्हणजे हुसेन अंबरखान होय. महाराष्ट्रात ज्या मुसलमान संतांनी मराठी भाषेत साहित्यनिर्मिती केली त्यात सर्वप्रथम हुसेन अंबरखान यांचा उल्लेख करावा लागतो. त्यांनी इ.स.१६५३ मध्ये लिहिलेली गीता टीका **‘अंबर हुसेनी टीका’** म्हणून प्रसिद्ध आहे. त्याने आपल्या टीकेचा उल्लेख **‘गीता भावार्थदीपिका’** असा केलेला आहे. या गीता टीकेत एकूण ८७१ ओव्या असून त्यामध्ये त्याने आपली कुलपरंपरा प्रारंभी कथन केलेली आहे. गीतेचा ‘तात्पर्यार्थ’ सांगणे हे त्याचे ध्येय आहे. तसेच त्याने ही गीता टीका लिहिताना इतर टीकाकारांचा उल्लेख करून स्वतःची भूमिका स्पष्ट केलेली आहे. मूळ संस्कृत शब्दाला नेमका मराठी शब्द योजनेचे कवीचे कौशल्य वाखाणण्याजोगे आहे

**०२.शेख महंमद :** महाराष्ट्रातील कबीराचा अवतार म्हणून शेख महंमद याचा उल्लेख केला जातो. तो कादरिया संप्रदायाचा सुफी संत असून त्याचे वडील राजे महंमद एक विख्यात सूफी संत होते. शेख महंमद एक क्रांतिकारक विचारांचे असून चांद बोधले यांचे ते गुरु होते. वयाच्या २६ व्या वर्षी ते संत म्हणून प्रसिद्ध पावले. छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजी राजे हे यांचे शिष्य होते. त्याबद्दल उल्लेख त्यांच्या अभंगातून येताना दिसतो. याशिवाय आणखी एका अभंगात त्यांनी चांद बोधले, जनार्दनपंत, संत एकनाथ यांची परंपरा दिलेली आहे. महंमदांनी मराठी, हिंदी, फारसी, उर्दू अशा भाषांतही साहित्यनिर्मिती केली आहे. त्यांच्या नावावर **‘योग-संग्राम,’ ‘पवनविजय,’ ‘निष्कलंक प्रबोध’** व काही भारुडे व अभंगही आढळतात.

**०३.शहा मुंतोजी बामणी :** मुंतोजी बामणी यांचे खरे नाव शहा मुर्तुझा कादरी होय. त्यांनी लिहिलेल्या हस्तलिखितावर ब्राह्मणी मुक्तोजी, ब्राह्मणी मृत्युंजय, ब्राह्मणी आणि ब्राह्मण मुक्तोजी अशा निरनिराळ्या नाममुद्रा आढळतात. त्यांचे साहित्य लेखन अत्यंत संपन्न आहे. त्यांचा **‘प्रकाशदीप’** हा ग्रंथ भाषात्मक व

अद्वैताचे विवेचन करणारा आहे. या ग्रंथांमध्ये समाधीअवस्थेपर्यंतचे योगविवरण आलेले आहे. तसेच त्यांनी **‘सिद्धसंकेत’** हा आणखी एक ग्रंथ लिहिला आहे. त्यांनी **‘सिद्धांतबोध’** हा ९८५८ हा त्यांचा आणखी एक बृहदग्रंथ व सहा तत्त्वचिंतनपर प्रकरणे व काही अभंग आणि पदरचना केलेली आहे.

शेख सुल्तान, जमाल फकीर, सय्यद हुसेन, सूफीदादा आतार, गरीब अब्दुल अशा इतरही काही सूफी संत कवींनी मराठी भाषेत साहित्य केली आहे.त्यांचे कार्य मराठी साहित्यातील अमूल्य देणगी आहे त्यात विविधता आहे. या कवितेतील विविधतेबद्दल ल. रा. नसिराबादकर म्हणतात, - “वर उल्लेखिलेली काव्यनिर्मिती पाहाता नाथांच्या काळातील मराठी साहित्याची निर्मिती विविध अंगानी होत होती, असे म्हटले पाहिजे. स्वतः नाथांच्या निर्मितीतच विविधता होती”[५] यावरून या साहित्यातील विविधतेचे स्वरूप लक्षात येते.

## ख्रिस्ती संप्रदाय:

"संप्रदाय व पंथ हे शब्द एकाच अर्थाने वापरले जात असले तरीही त्यातून दोन भिन्न गोष्टी सूचित होतात. संप्रदाय शब्दावरून परंपरा सूचित होते. दैवी अनुभूती संपन्न अशा एखाद्या पुरुषापासून परंपरा सुरू होते. त्यास संप्रदाय म्हटले जाते. ही अनुभूती मानवी जीवनात प्रत्येकास घेता आली पाहिजे , या तळमळीने काही विशिष्ट साधनेची रूपरेषा संप्रदाय प्रवर्तकांकडून निश्चित केली जाते अनुभूती ध्येयाकडे नेण्याचा तो मार्गक्रमच आखलेला असतो. त्या मार्गक्रमासच पंथ हे नाव लागू पडते. संप्रदाय व पंथ ही दोन नावे भिन्न पदार्थ दाखवीत नसून एकाच वस्तूची दोन भिन्न रुपे होत. एकाच प्रवाहाच्या दोन बाजू होत.”[६]

महाराष्ट्रातील ख्रिस्ती धर्माचा धर्माच्या पंथाचा अभ्यास केल्यास असे जाणवते की इ.स. १५१० मध्ये पोर्तुगीजांनी गोवा प्रांतात आपले वर्चस्व प्रस्थापित

करून तोपर्यंत आपल्या आधिपत्याखाली घेतला त्यानंतर त्या प्रदेशात इतरही काही धर्म पंथ यांचा प्रवेश झाला त्यांनीही आपला धर्म प्रचाराचे व प्रसाराचे कार्य सुरू केले त्यानंतर थोड्याच कालावधीत ब्रिटिशांचे आगमन झाले आणि त्यांच्या आगमनाबरोबरच गोवा आणि महाराष्ट्रात ख्रिस्ती धर्म संप्रदाय ख्रिस्ती धर्मप्रसारक यांच्या संख्येत मोठी वाढ झाली पुढे चालून ही संख्या वाढत गेली फादर स्टीफन्स, फादर क्रूआ आणि यासारख्या धर्मप्रसारकांनी येथे ख्रिस्ती सेंट पीटर्स यांनी इत्यादी ख्रिस्ती धर्म संतांवर मराठी भाषेतून काही रचना केल्या हा कालखंड म्हणजे मराठीत संस्कृतीच्या वळणावरच्या वृत्तात्मक रचनेचा लोकप्रिय होण्यापूर्वीचा होता या कारणास्तव या रचना संतांनी केलेल्या कथा साहित्याच्या जवळचा निर्माण करणाऱ्या ठरतात त्यामुळे ख्रिस्ती धर्मातील संतांनी आख्यानावर आधारित फवारणी करताना मराठी भाषेत हेतुपूर्वक केली आहे.

## ख्रिस्ती संप्रदायाचे तत्त्वज्ञान :

‘सर्व समर्थ देव जो पिता, आकाश व पृथ्वी यांचा उत्पन्नकर्ता, यावर मी विश्वास ठेवतो. एकच प्रभू, देवाचा एकुलता एक पुत्र, जो पापीजनांना तारावयास ह्या जगात आला. पवित्र आत्म्याच्या योगाने गर्भरूप झाला, कुमारी मेरीच्या उदरी जनमस आला पिलाताच्या वेळेस ज्याने दुःख भोगले, ज्याला क्रुसावर दिले, ज्याला पुरण्यात आले, जो मेलेल्यामधून तिसऱ्या दिवशी उठून स्वर्गात गेला व सर्वसमर्थ देव यांच्या उजवीकडे बसला व जेथून तो जिवंत असलेल्यांचा व मृतांचा न्याय करण्यासाठी येणार आहे त्याच्यावर मी विश्वास ठेवतो’ अशा स्वरूपाचा सिद्धांत ख्रिस्ती धर्मात पाळला जातो.

परमेश्वरच स्वतः पृथ्वीवरील समग्र मानव जातीचे कल्याण करण्यासाठी मानवाचे रूप धारण करून या भूतलावर अवतरला आहे, अशा स्वरूपाचा या धर्माचा सिद्धांत आहे. आणि या सिद्धांताला चर्चमध्ये महत्त्वाचं मानलं जातं. या पृथ्वीवर

मानवी देहाचा स्वीकार करून राहणारा येशू हा प्रत्यक्ष परमेश्वरच होता पण परमेश्वराला स्वतःचे रूप दाखवायचे होते म्हणून त्याने येशूच्या रूपात अवतार घेतला असं या धर्मातील तत्वज्ञान सांगते .त्याची मानवाशी सहकार करण्याची इच्छा होती. परमेश्वर मानवाला तो कसाही असला तरी त्याला जवळ करण्यात कमीपणा मानत नाही. उलट तो सदैव मानवावर प्रेमाचा वर्षावच करत असतो, अशा स्वरूपाचे तत्त्वज्ञान या धर्मामध्ये सांगितले जाते.

**ख्रिस्ती धर्माची उपासना :**

खिस्ती धर्माच्या कर्मकांडात सामुदायिक उपासनेला आत्यंतिक महत्त्व दिले जाते. ही सामुदायिक प्रार्थना व उपासना दर रविवारी सकाळी अथवा सोयीच्या दिवशी व सोयीच्या वेळी चर्चमध्ये जाऊन धर्मगुरूंचा मार्गदर्शनाखाली केली जाते. उपासनेच्या कार्यक्रमात सामुदायिकरित्या गीत गाणे, पवित्र शास्त्रातील स्तोत्रे वाचन करणे, 'प्रभूची प्रार्थना' म्हणून प्रचलित असलेली प्रार्थना सामुदायिक रीतीने म्हणणे इत्यादी उपसनांचा समावेश असतो.

या संप्रदायातील काही अनुयायी दर रविवारी सामुदायिक उपासनेच्या शेवटी तर काहीजण महिन्यातून एकदा 'प्रभुभोजन') लोर्ड्स सफर( हा विधी पाळतात. याप्रसंगी खमीरविरहित भाकर व द्राक्षाचा उकडून केलेला रस द्राक्षरस दिला जातो . ज्यांचा 'बाप्तिस्मा' आणि 'दृढीकरण' हे संस्कार झालेले आहेत त्यांनाच या विधीत भाग घेता येतो. ज्याला हा पवित्रविधी पार पाडण्याची दीक्षा दिलेली आहे तोच किंवा तेच भाकर आणि द्राक्ष पवित्र म्हणून 'वेगळी' करतात. तीच नंतर इतर आचार्यांद्वारे भक्तगणामध्ये वाटली जाते. यात धर्मगुरू बायबलमधील उतारा वाचून द्राक्षरस व भाकर वेगळी करुन प्रत्येक उपासकास देतात आणि या विधीनंतर शेवटी गायन, प्रार्थना होऊन 'प्रभू येशूची शांती तुम्हावर असो' असा आशीर्वाद देऊन या विधीचा शेवट केला जातो .अशाप्रकारे ख्रिस्ती धर्मामध्ये उपासना केली जाते.

## ख्रिस्ती संप्रदायाचे मराठी साहित्य :

इतर सांप्रदायिकांनी, पंथीय प्रचारकांनी ज्याप्रमाणे आपल्या धर्माच्या प्रचारासाठी-प्रसारासाठी आपल्या पंथाच्या तत्त्वज्ञानाच्या प्रसारासाठी अशा इतरही काही हेतूने ग्रंथनिर्मिती केली. तशाच स्वरूपाचे त्याच हेतूने ख्रिस्ती धर्मातील पंथप्रसारकांनी देखील आपले वाङ्मयीन लेखन केलेले आहे. त्याचा थोडक्यात आढावा येथे घेता येईल .

०१. **फादर स्टीफन्स:** फादर स्टीफन्स हा ख्रिस्ती मिशनरी २४ ऑक्टोबर, १५७९ ला गोव्यात प्रवेशित झाले. ही व्यक्ती म्हणजे भारतात आलेली पहिली इंग्रजी व्यक्ती होय. फादर स्टीफन्स यांनी कोकणी मराठीचे एक व्याकरणही पोर्तुगीज भाषेतून लिहिले आहे. त्यांनीच पुढील काळात **'क्रिस्तपुराण'** नावाचा दहा हजारांहून अधिक ओवीसंख्या असणारा ग्रंथ इ.स .१६१४ मध्ये लिहिला. प्रस्तुत ग्रंथात लेखकाने मराठी भाषेविषयीचा आदर मोठ्या सौंदर्यात्मक पद्धतीने व्यक्त केला आहे. या ग्रंथाचा विषय हा ख्रिस्ताची कथा आहे. "प्राचीन मराठी भक्तिकाव्याचा विशेषत: तथाकथित ज्ञानदेवकृत योगवशिष्ठचा व विष्णुदासनामाकृत महाभारताचा क्रिस्तपुराणावर विशेष ठसा आहे. बायबली कथाचौकटीवर खास मराठमोळा वेलविस्तार जन्माने इंग्रज असलेल्या एका कवीने करावा, हे विशेष लक्षणीय आहे"[७] यात लेखकाने 'दौत्रिना क्रिस्ता' या नावाची एक धर्मतत्वाचे कथन करणारी प्रश्नोत्तरी मराठीच्या गोमंतकीय बोलीत लिहिली आहे .

**०२. फादर क्रुआ :** फादर स्टीफन्सप्रमाणे सेंट पीटर यांच्या जीवनावर फादर क्रुआ याने त्रिखंडात्मक असे **'महापुराण'** लिहिले आहे. या पुराणाच्या आरंभी लेखकाने विश्वकर्त्याला नमन करून केला आहे. प्रस्तुत ग्रंथातून हिंदू देवदेवतांवर आणि आचारांवर कडक शब्दात टीका केली आहे. हा धर्मप्रसारक इ.सं. १६०२ मध्ये

गोव्यात आला. त्याने मराठी व कोकणीचा अभ्यास करून **'पीटर पुराण'** हा साधारण १५०००ओव्या असणारा ग्रंथ लिहिला.

या वरील दोन लेखकांशिवाय **आंतुनियु सालंदाज** या संतचरित्रकाने सांतु आंतुनिची जीवनकथा कथन केली आहे .**'जीवित्ववृक्षाची फळे'** हा त्याचा ग्रंथ गोमंतकीय बोलीत रचलेला आहे. तर पाद्री मानुऐल जोंकीस द नोरोंज यांनी 'ख्रिस्ताचे यातना गीत' लिहिले आहे. अशाप्रकारचे साहित्य लेखनाचे कार्य ख्रिस्ती मिशनऱ्यांनी मराठी भाषेत केले आहे. ही सर्व साहित्यनिर्मिती भक्तिभावनेने झालेली नसून केवळ धर्माच्या प्रचारार्थ झालेली आहे. असे या ग्रंथाच्या स्वरूपावर म्हणता येते. याबद्दल ल.रा.नासिराबादकर म्हणतात, - "या सर्व ख्रिस्तीधर्मियांनी आपल्या धर्मप्रसाराच्या निमित्ताने जे साहित्य लिहिले त्यात धर्मप्रसाराचा आवेश आणि काही ठिकाणी पक्षपातीपणा असला, तरी या काळातील मराठी साहित्यनिर्मितीचे स्वरूप माहित होण्यासाठी त्याची मदत होते. क्रिस्तपुराणाची प्रस्तावना नाथकालीन गद्याची ओळख पटविणारी आहे"[८] हा त्यांचा अभिप्राय ख्रिस्ती संतांच्या ग्रंथनिर्मितीमागील हेतू स्पष्ट करतो.

अशाप्रकारे महाराष्ट्रात हिंदू संप्रदायाच्या संत कवींनी ज्या पद्धतीचे साहित्य लिहिले आहे त्याचाच वसा पुढे चालू ठेऊन अन्य धर्मातील / संप्रदायातील संत कवींनीही मराठी भाषेत साहित्य लेखन केलेले आहे. त्यांचा साहित्यनिर्मिती मागील हेतू धर्माचा प्रसार व प्रचार करण्याचा असला, आपला धर्म / पंथ  येथे रुजावा-वाढवा म्हणून त्यांनी येथील बोलीभाषेचा अवलंब करून आपला धर्म व त्याचे तत्वज्ञान, त्यांचा आचारधर्म सर्वसामान्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न याद्वारे केला असला तरी त्यांनी मराठी भाषेच्या विकासात जे योगदान दिले आहे ते खूप मोलाचे आहे. या सर्व संतकवींनी तत्कालीन कालखंडात मराठी भाषेचा स्वीकार करून समाजात समन्वय साधून एकात्मतेचा विचाराला चालना देण्याचे महान कार्य केले.

त्याचबरोबर अंधश्रद्धा निर्मुलनाचाही हा प्रयत्न होता. या सर्वच संप्रदायांचा त्यावेळच्या महाराष्ट्रातील विविध भागातील लोकमानसावर, समाजमनावर एक प्रकारचा प्रभाव होता. आणि हे अन्य धर्मातील संप्रदाय त्याकाळी अस्तितत्वात असणाऱ्या इतर हिंदू धर्मातील संप्रदायाच्या प्रभावापासून अलिप्त नव्हते. त्यामुळे या सर्वांनीच महाराष्ट्रात मध्ययुगीन कालखंडात एकात्मतेचे, सामंजस्याचे आणि समन्वयाचे वातावरण निर्माण केले असे म्हटले तर ते धाडसचे होणार नाही असे वाटते. तसेच वाङ्मय निर्मितीतून ग्रामसंस्कृती जपण्याचे, भाषेवर संस्कार करण्याचे, समाजाला विवेकशील बनवण्याचे कार्य या संतांच्या साहित्य लेखनाने केले. या साहित्यामुळे महाराष्ट्राला वेगळ्या धर्माचा, त्या धर्मातील तत्वज्ञानाचा-आचारधर्माचा, वेगळ्या समाजाचा, वेगळ्या संस्कृतीचा परिचय झाला. त्याचाच परिणाम म्हणून आज आपणाला मराठी संत साहित्याचे दालन विविधतेने नटलेले फुललेले दिसते. ही विविधता रसिकमनाला निश्चितच भूरळ घालते. त्यास्तव मराठी साहित्य आज विलोभनीय वाटते.

*********************

**संदर्भग्रंथ :**

१. पगडी, सेतू माधवराव : “सूफी संप्रदाय”, परचुरे प्रकाशन, मुंबई, १९५३, पृ. १.

२. यजदानी, कौसन : “सूफी दर्शन एवं सासधना”, जे.के. मिडिया प्रा.लि., निझावेट, पृ. ९.

३. तिवारी, रामपूजन : “साधना और साहित्य”, प्रज्ञान मंडल, वाराणसी, सन संवंत २०२५, पृ. ६५-६६.

४. शेख, एजाज : “सूफी संप्रदाय’, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २००९, पृ. २९८.

५. नसिराबादकर, ल. रा. : “प्राचीन मराठी वाङ्मायचा इतिहास”, फडके प्रकाशन, कोल्हापूर, दहावी संस्कारित व सुधारित आवृत्ती, मार्च, २०१३, पृ. १५५.

६. बाहिरट, भा.पं.: “महाराष्ट्रातील पाच संप्रदाय”, प्रसाद प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९७५, पृ. १४.

७. जोशी, लक्क्ष्मणशास्त्री (संपा.) : “मराठी विश्वकोश” (खंड ४),महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९७६, पृ. ४६२.

८. नसिराबादकर, ल. रा. : उनि., पृ. १५४.